# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी
## माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश अधिसुचना

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र ( **Gardner's Training Certificate Course** ) या एक वर्ष कालावधीच्या २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यासाठी इयत्ता ९ वी उत्तीर्ण उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रवेश अर्ज आणि माहिती पुस्तीका प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय,परभणी व कृषि तंत्र विद्यालय,पैठण रोड, औरंगाबाद यांचे कार्यालयातून खुल्या प्रवर्गासाठी रु.५०/- व मागासवर्गीयांसाठी रु.२५/- रोखीने सुट्टीचे दिवस वगळुन दिनांक १५-६-२०१८ पासुन कार्यालयीन वेळेत मिळु शकतील किंवा प्रवेश अर्ज टपालाने पाहिजे असल्यास खुल्या प्रवर्गासाठी रु.५०/- व मागासवर्गीयांसाठी रु.२५/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा परभणी येथे देय असलेला धनाकर्ष (Demand Draft) नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी यांच्या नांवे व स्वतःचा संपूर्ण पत्ता असलेला लिफाफा रु.४०/- च्या टपाल हाशीलासह पाठविल्यास मिळु शकेल.

या अभ्यासक्रमा करीता वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांतर्गत मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील रहिवासी उमेदवार पात्र असतील. मागासवर्गीय उमेदवारांचे प्रवेश अर्ज प्राप्त करण्यासाठी मागासवर्गीय असल्या बाबतचे प्रमाणपत्र दाखविणे आवश्यक आहे. तसेच डिटी (ए), एनटी (ब), (क), (ड), इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना दिनांक ०१-०४-२०१८ नंतर निर्गमित केलेले अ-उन्नत गट प्रमाणपत्राची फोटो प्रत प्रवेश अर्ज विकत घेतांना सादर करणे आवश्यक आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुविधा खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

१. कृषि तंत्र विद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी (अनुदानीत)- **प्रवेश क्षमताः** ४० विद्यार्थी
२. कृषि तंत्र विद्यालय,पैठण रोड, औरंगाबाद (विनाअनुदानीत) - **प्रवेश क्षमताः** ४० विद्यार्थी

अर्जासोबत इयत्ता ९ वी परिक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला किंवा अर्ज सादर करण्यापुर्वी **एखाद्या संस्थेत प्रवेश घेतला असेल अशा संस्थेचे बोनाफाईड** प्रमाणपत्राच्या व माहिती पुस्तीकेत नमुद केल्या प्रमाणे इतर आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या सत्यप्रति जोडणे आवश्यक राहील.

संपूर्ण भरलेले अर्ज,विहित प्रमाणपत्राच्या प्रतिसह कृषि तंत्र विद्यालय, वनामकृवि, परभणी व कृषि तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद येथे दिनांक १०-०७-२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९ ते १.३० व दुपारी २ ते ४.४५) वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

तात्पुर्ती तसेच सुधारीत गुणवत्ता यादी घटक कृषि तंत्र विद्यालय,परभणी व कृषि तंत्र विद्यालय,पैठण रोड, औरंगाबाद येथे माहिती पुस्तिकेत नमुद केलेल्या दिनांकास लावण्यात यईल. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया माहिती पुस्तीकेतील प्रवेश कार्यक्रमा प्रमाणे अमलात येईल.

निवडी बाबतची माहिती पत्राद्वारे कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. प्रवेश गुणवत्ता व शासनाच्या आरक्षण नियमा नुसार केला जाईल. अपूर्ण तसेच विहीत ताराखेनंतर आलेले प्रवेश अर्ज विचारात घेतले जाणार नाही. प्रवेश अर्ज व माहिती पुस्तीकेत इतर आवश्यक माहिती देण्यात आलेली आहे. ती काळजीपूर्वक वाचुन त्या प्रमाणे अर्ज व प्रमाणपत्र सादर करावे. **टपाल विलंबास विद्यापीठ जबाबदार रहाणार नाही**. सदरची प्रवेश अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळ www.vnmkv.ac.in वर ही पाहता येईल.

क्रमांकः एएक्सएन/
दिनांक. / /

कुलसचिव
वसंतराव नाईक मराठवाडा
कृषि विद्यापीठ, परभणी